**वाचा** :- १. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५,दि.१२/०५/२००६

२. शासन वित्त विभाग अधिसूचना क्र.सेवाप्र-२०१९/प्र.क्र.३३/कोषा (प्रशा-३), दि.२७/०५/२०१९.

---

क्र.स्था.१८/ब/बदलीचे प्राधिकार/ आस्था-५/

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**

# स्थायी आदेश क्र ०४/२०१९ दिनांक: २८/०५/२०१९

**प्रस्तावना:**

उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ दि.१२/०५/२००६ नुसार प्रकरण दोन मधील अ.क्र. ६ मधील तक्त्यानुसार शासनाने शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदली करण्यास सक्षम प्राधिकारी विनिर्दिष्ट केलेले आहेत. सदर अधिनियमातील प्रकरण दोन मधील अ.क्र. ७ नुसार या अधिनियमांच्या प्रयोजनाकरीता प्रत्येक प्रशासनिक विभाग आपल्या अधिकारीतेतील विभागप्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुखांची यादी तयार करून प्रकाशित करील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आपल्या अधिकारीतेतील बदल्या करण्यासाठी सक्षम असणारे प्राधिकारी अधिसूचित करील अशी तरतूद आहे. त्यानुसार शासन वित्त विभाग यांनी वाचा क्र. २ अन्वये यासंदर्भात निर्गमित केलेले मागील सर्व आदेश, अधिसूचना अधिक्रमित करून गट क व ड संवर्गाकरीता बदली करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून गट क करीता संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा व गट ड मधील कर्मचाऱ्यांकरीता विभागीय प्रादेशिक सह संचालक यांना अधिसूचित केले आहे. वाचा क्र.१ वरील अधिसूचनेमधील अ.क्र. ६ मधील तरतूदीनुसार तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या कलमाखालील त्याचे अधिकार त्याच्या कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्याकडे सोपविता येतील. त्यानुसार संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांचेकडे असलेले गट क मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे प्राधिकार विभागीय सह संचालक यांना प्रत्यार्पित करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश :**

वाचा क्र.१ मधील प्रकरण दोन च्या अ.क्र.६ व ७ मधील तरतूदीनुसार तसेच वाचा क्र.२ वरील अधिसूचनेनुसार संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई हे त्यांना प्राप्त असलेले संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे अधिनस्त गट क मधील कर्मचाऱ्यांची बदली करण्याचे अधिकार हे

खालील तक्त्यात रकाना क्र. ३ मध्ये नमूद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी रकाना क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यांना प्रत्यार्प्रित करीत आहेत.

| अ.क्र. | बदलीचे प्राधिकार प्रत्यार्पित करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांचे पदनाम | शासकीय कर्मचाऱ्यांचा गट |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण विभाग | त्यांच्या अधिकार क्षेत्रातील गट क चे कर्मचारी |
| २ | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग | त्यांच्या अधिकार क्षेत्रातील गट क चे कर्मचारी |
| ३ | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नाशिक विभाग | त्यांच्या अधिकार क्षेत्रातील गट क चे कर्मचारी |
| ४ | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद विभाग | त्यांच्या अधिकार क्षेत्रातील गट क चे कर्मचारी |
| ५ | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अमरावती विभाग | त्यांच्या अधिकार क्षेत्रातील गट क चे कर्मचारी |
| ६ | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर विभाग | त्यांच्या अधिकार क्षेत्रातील गट क चे कर्मचारी |

**(सु.रा. भोसले),**
**संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**नवी मुंबई.**

प्रति,

१) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण विभाग/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर विभाग
२) सह संचालक(प्रशासन), स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई

प्रत माहितीस्तव

१) मा. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सह सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) कक्ष अधिकारी, कोषा प्रशा-३, मंत्रालय, मुंबई
४) सह संचालक (म.न.पा.ले.प), स्थानिक निधी लेखापरीक्षा, रायगड भवन, नवी मुंबई
५) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व जिल्हे.
६) निवड नस्ती.
७) अभिलेखापाल.

Harshada/disk३/astha५/badali/badali pradhikar/२८.०५.२०१९